**निकोप मनाचा अभिरुचीसंपन्न सुहृद**

**प्रा. म. द. हातकणंगलेकर**

नव्या वर्षाचा आरंभ होताच एक सुरेख कॅलेंडर आणून मी ते माझ्या खोलीत लावले. ते चाळत असताना फेब्रुवारीच्या एक तारखेकडे सहज माझे लक्ष गेले, आणि मला आठवले, की प्रा. हातकणंगलेकरांचा याच दिवशी वाढदिवस असतो. यंदाच्या त्यांच्या वाढदिवसाला तर आगळेच महत्व आहे. कारण यंदाच वयाची साठ वर्षे पुरी करून ते एकसष्टाव्या वर्षात पाऊल टाकणार, आणि या वर्षी ते सेवानिवृत्तही होणार. मी मनाशी म्हटले, "छे! हे खरेच वाटत नाही. काय वर्ष तरी गेली बघता बघता." तो विचार मनात आल्यावर सुमारे तीस वर्षापूर्वीचा एक प्रसंग माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला आणि मला मनापासून हसू आले!

'फर्ग्युसन'मधून बदली होऊन त्यावेळी मी नुकतीच 'विलिंग्डन'मध्ये आले होते. एके दिवशी कोल्हापूरहून प्रसिद्ध लेखक शि. आ. स्वामी यांचे मला पत्र आले. मी शाळेत शिकत असताना स्वामी आमच्या 'किर्लोस्कर' मासिकाच्या कचेरीत काम करीत असत. त्यामुळे आमची चांगली गट्टी होती. प्रा. हातकणंगलेकर नावाचे आपले एक अतिशय हुशार मित्र, त्यांची धारवाडच्या सरकारी कॉलेजातली नोकरी संपवून लवकरच सांगलीला 'विलिंग्डन'मध्ये येत आहेत असे त्या पत्रातून त्यांनी कळविले होते. आणि पुढे म्हटले होते, "मालू, तू त्यांची अवश्य ओळख करून घे."

त्या पत्रानंतर दोन-चार दिवसातीलच ही घटना. एक दिवस दुपारी, आमच्या 'कॉमनरूम'मध्ये, नीटनेटका पोशाख केलेले, मध्यम वयाचे, थोड्या स्थूल बांध्याचे एक गृहस्थ काहीतरी वाचीत बसलेले मला दिसले. त्यांचा रंग गव्हाळ, चेहरा घवघवीत आणि गोलसर होता. कपाळ प्रशस्त आणि डोळे मोठे होते. त्यांच्या डोक्यावरील विरळ केसामुळे की काय, कोण जाणे, पण वयाच्या मानाने मला ते थोडे प्रौढ वाटले. वृत्तीने ते थोडे गंभीर असावेत आणि आपण भले की आपले काम भले, असा त्यांचा स्वभाव असावा, असा माझा त्यांच्याविषयी प्रथमदर्शनी ग्रह झाला. पण ते कोण आहेत हे जाणण्याची उत्सुकता असल्याने, मीच पुढे होऊन त्यांना नमस्कार केला आणि स्वतःचा परिचय करून देऊन विचारले, "आपण प्राध्यापक हातकणंगलेकर काय?" त्यावर हळूऽऽ आवाजात जमिनीकडे पाहत, कपाळावरून किंचित हात फिरवून त्यांनी उत्तर दिले, "होय मीच." बस्स इतकेच! ते उत्तर ऐकून मी स्वतःशी म्हटले, "हे भलतेच अबोल आणि लाजाळू काम दिसते आहे."

प्रा. हातकणंगलेकर तसेच आहेत हे खरे आहे. पण इतक्या वर्षांच्या त्यांच्या सहवासाने स्नेहाने आणि अनुभवांनी माझ्या लक्षात आले आहे, की या त्यांच्या स्वभावातच एक हळुवार, विलक्षण संवेदनाशील आणि स्निग्ध असे मन लपलेले आहे. ते मन आपल्या सहवासात येणाऱ्यांना समंजसपणे समजावून घेते. दुःखासंकटात आपुलकीने व कणखरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहते. त्याबद्दलचा माझा एक अनुभव सांगते. १९७० साली माझी आई पुण्याला, हृदयविकाराने कालवश झाली. ती दुःखद वार्ता डॉ. रणभिसे यांच्याकडे रात्री बाराच्या सुमारास फोनने आली. तेवढ्या अपरात्रीही आमचे डॉक्टरसाहेब, ज्यूलियासह सांत्वनार्थ माझ्या घरी आले. दुःखाच्या धक्क्यातून जरा सावरल्यावर मान वर करून मी बघते तर डॉक्टरसाहेबांच्या पाठीमागे प्रा. हातकणंगलेकर मान खाली घालून उदास चेहऱ्याने उभे! मला एकदमच पुन्हा गहिवरून आले. रात्री लगेच मी पुण्याला गेले. दुसऱ्या दिवशी माझ्या कुटुंबियांना हातकणंगलेकरांनी जी तार धाडली तीत म्हटले होते, "प्लीज टेक केअर ऑफ मालतीबाई." आजही ते आठवून माझे डोळे पाणावतात.

अलिकडेच त्यांचे मित्र सुप्रसिद्ध लेखक श्री. दा. पानवलकर यांचे सांगलीत निधन झाले. आपल्या मित्राच्या या अवघड आणि अखेरच्या दुखण्यात 'एम.डी.एच'नी (मी त्यांच्या नावाच्या इंग्रजी अक्षरांनीच त्यांना हाक मारते) त्यांची किती मनोभावे सेवाशुश्रूषा केली, परोपरीने त्यांच्या आप्तस्वकीयांना किती धीर दिला, मार्गदर्शन केले, हे ज्यांनी पाहिले आहे त्यांनाच ठाऊक.

त्यांची वाणी जशी मितभाषी तशीच त्यांची लेखणीही! त्यांच्या पुस्तकांच्या प्रस्तावना देखील याची साक्ष देतील. 'साहित्यातील अधोरेखिते' या पुस्तकाच्या प्रारंभी त्यांनी लिहिले आहे, "ती दादांना - ज्यांनी माझी पहिली अक्षरे कौतुकाच्या नजरेने भिजवली" 'भिजवली' हा एकच शब्द पण त्यातून सारे हृदय कळते! एखाद्या मित्राला त्यांनी लिहिलेले पत्र असो, वर्गबंधू 'हुतात्मा पत्रावळ' यांचे भावनेने ओलावलेले शब्दचित्र असो, साहित्य अकादमीतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या इंडियन लिटरेचर या इंग्रजी द्वै-मासिकातील कविवर्य बोरकरांच्या 'चैत्रपुनव'ची समीक्षा असो, की क्वेस्टमधले एखादे लहानसे स्फुट असो, त्यांचे सारे लेखन कसे कसदार आणि संपन्न असते. त्यांची लेखणी त्यांच्या मनातील भावनांचे विचारांचे नितळ प्रतिबिंब वाचकांच्या मनात उमटविण्यात कुशल आहे. शाळेपासून एम. ए. अखेर 'एम.डी.एच' पहिल्या नंबरने पास झालेले, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाबद्दल अनेक पारितोषिकेही त्यांनी मिळवलेली, असे असूनही पांडित्याच्या ओझ्याने त्यांची लेखणी वाकली नाही, की बोजड आणि रूक्ष बनली नाही. मला याचे अप्रूप वाटते. ते इंग्रजी जेवढे सफाईदार, डौलदार आणि सुरेख लिहितात-बोलतात तेवढेच मराठीही लिहितात. तसेच वेधक तसेच पारदर्शक! शब्दांच्या सूक्ष्म अर्थछटांची दोन्हीही भाषातली, त्यांची जाण पाहिली म्हणजे अनेकदा मी मनाशी म्हणते, "खरं म्हणजे हा शब्द यापूर्वी आपण कितीदा तरी वाचलाय, ऐकलाय पण इथे पाहा तो कसा समर्पक आणि चपखलपणे बसलाय. हा काढून त्याच अर्थाचा दुसरा शब्द तिथे आपण घातला तर त्याचे लावण्य एकदम कोमेजल्यासारखेच होऊन जाते. आणि मग आपण ओळखतो, की कुशल रत्नपारख्याप्रमाणे हे नाजुक कामही तशाच कसबी प्रतिभावंताचे आहे.

तुम्ही त्यांच्या घरी जा, की महाविद्यालयातल्या 'अभ्यासिकेत जा. त्यांच्या टेबलावर नेहमीच निरनिराळ्या विषयांवरच्या इंग्रजी-मराठी पुस्तकांचा, मासिकांचा ढीग पाहायला मिळेल. कशावर अभिप्राय लिहायचा असतो, कशावर 'आकाशवाणी'वर बोलायचे असते. त्यातल्या एखाद्या पुस्तकातच त्यांच्या नव्या लेखा-भाषणाची हस्तलिखित प्रत ठेवून दिलेली आढळते. तिचे वैशिष्ट्य हे, की कागदावर एकदा 'लिहिले तेच 'फायनल'. रफ-फेअर वगैरे भानगड नाही. पुन्हा सगळे लेखन कसे टपोऱ्या वळणदार अक्षरातले, म्हणून आकर्षक असे!

इंग्रजी आणि मराठीमधली निवडक पुस्तके ते स्वतः जातीने खरेदी करतात. एकाग्र चित्ताने, साक्षेपी नजरेने त्यांचे वाचन, चितन, मननही सदैव चालू असते. आपल्या स्नेही परिवाराला त्यातल्या आवडलेल्या पुस्तकांची शिफारस करणे, प्रसंगी ती पुस्तके स्वतः नेऊन देणे हेही चाललेले असतेच. पण एवढ्यावरच न थांबता आपण लुटलेला वाचनाचा, वाङ्मयाचा आनंद सुजाण वाचकांनाही द्यावा अशी त्यांची प्रांजल धडपड असते. त्यांच्या पक्व व्यासंगाचे स्वतंत्र बुद्धीचे आणि प्रसन्न प्रतिभेचे दर्शन आपल्याला त्यांच्या पुस्तकातून, चर्चा-परिसंवदातून आणि अध्यक्षीय भाषणातून वेळोवेळी घडतेच. ही सारीच आपल्या बुद्धीला नवनवे खाद्य देत असतात. त्यांच्या पुस्तकातून सहित्यातील प्रश्नोपप्रश्नांचे जे विश्लेषण, मंथन किंवा समीक्षण त्यांनी केले आहे त्यावर काही लिहावे अशी पात्रता माझ्याजवळ मुळीच नाही पण तरीही मला एवढे जाणवते, की आपल्या समतोल व प्रगल्भ समीक्षेने आणि विदग्ध बुद्धीने मराठीतील साहित्यावर त्यांनी आपली बहुमोल नाममुद्रा निश्चित उठवली आहे. "'हातकणंगलेकर' या पुस्तकाबद्दल काय म्हणतात?" किंवा "हातकणंगलेकरां'नी माझ्या पुस्तकावर लिहावे-बोलावे" अशी सुप्त इच्छा केवळ उदयोन्मुख साहित्यकारांच्याच मनात असते असे नाही तर अनेक नामवंत, प्रतिभावंतही त्यासाठी उत्सुक असतात ही वस्तुस्थिती आहे.

त्यांचे वक्तृत्व ही अशीच एक अलोलकीची गोष्ट आहे. त्यांच्या लेखणीचे धर्म तर त्यांच्या वक्तृत्वातून चमकतातच, पण त्यातून आणखीही खूप काही लाभते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय शैक्षणिक आहे, की वाङ्मयीन, की आणखी कोणता या विचारात श्रोते पडतच नाहीत. "आज प्रा. हातकणंगलेकर बोलणार आहेत तेव्हा जायला हवेच" अशी त्यांची प्रामाणिक प्रतिक्रिया असतेच. मग भले ते हातकणंगल्यामधल्या आपल्या आठवणी सांगोत, विद्याधर पुडलिकांचा परिचय करून देवोत, टॉलस्टॉयच्या वॉर अँड पीस या महाकाय, जगप्रसिद्ध कादंबरीची तास-दीडतासात ओळख करून देवोत किंवा नरहर कुरुंदकरांच्या नेहरूंवरील भाषणावर अध्यक्षीय मत मांडोत. काहीतरी उद्‌बोधक, विचारपोषक असे ऐकायला मिळणार याबद्दल श्रोत्यांची खात्रीच असते. भाषणाची सुरूवात हळू आवाजात,

खालच्या सुरात होते, किंचित बैठा व घोगरा असा तो आवाज हलकेच थोडाथोडा मोठा होतो. भाषणात हावभाव माफक, किंचित दोन्ही पंजे पुढे करणे, क्वचित कानामागे खाजवणे, असे काही!

वरवर पाहिले तर दृष्टी समोर असते पण तिचे खरे अवधान आपल्या विषयात व्यग्र असते. पाल्हाळ, विषयांतर, अलंकारिक भाषा, स्वतःबद्दल आत्मनेपदी बोलणेबिलणे साफ वर्ज्य! भाषणात उपहास, उपरोध जवळजवळ नाहीच, पण चतुर श्रोत्यांच्या लक्षात येईल असा खोचदारपणा मात्र कधीकधी त्यात डोकावतो. मिश्किल आणि नर्म विनोदाच्या गुलाबपाण्याने श्रोत्याला गुदगुल्या होतात, तो खळखळून हसतो आणि भाषणात रंगून जातो. कोणत्याही प्रश्नाच्या बाजू समजून घेण्याची त्यांची मनापासून तयारी असते. आपले विचार ते आत्मविश्वासाने मांडत असले तरी त्यात अभिनिवेश, इतरांबद्दलची तुच्छता डोकावत नाहीत. त्यांचे खास त्यांच्याच शैलीतले भाषण श्रोत्याला अंतर्मुख करत, त्याला समंजस दृष्टी देते. यामुळे त्या भाषणाला एक आगळाच डौल प्राप्त होतो. त्यांची लेखणी असो, की वाणी असो, सदभिरुचीची, औचित्याची लक्ष्मणरेषा कधी ओलांडत नाही. अशी सुरेख व्याख्याने ऐकायला मिळत असल्याने महाविद्यालयीन शिक्षणाचा निरोप घ्यायची वेळ आली म्हणजे, "बाई सरांची भाषणे टेप करून ठेवायला हवी होती हो, म्हणजे ती पुन्हा पुन्हा ऐकायला मिळाली असती अशी हुरहुर त्यांच्या कितीतरी विद्यार्थ्यांनी माझ्याजवळ आजवर बोलून दाखवली आहे.

हातकणंगलेकरांच्या अशा व्यक्तिमत्वामुळे सांगली-मिरजेच्या व्याख्यानमाला किंवा साहित्यसभा आणि आकाशवाणी व वृत्तपत्रे यांनाच नव्हे तर एकूणच दक्षिण महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळींना 'एम.डी.एच' हा फार मोठा आधार वाटतो. गेल्या काही वर्षात साहित्यसंमेलनापासून बृहन्महाराष्ट्रातल्या अनेक लहान-मोठ्या गावातून त्यांना व्याख्यानाची आमंत्रणे येतात. पीएच.डी. चे परीक्षक म्हणून त्यांना जावे लागते. 'साहित्य संस्कृतिमंडळ' किंवा 'साहित्य अकादमी'च्या सभांसाठी मुंबई-दिल्ली अशा फेऱ्याही ते करीत असतात. त्यामुळे 'विश्रामबागेत' हल्ली त्यांची गाठभेट दुर्मिळच होऊ लागली आहे. म्हणून गमतीने मी त्यांना म्हणते, "आता रेल्वेचा एखादा पासच का नाही तुम्ही काढून ठेवीत? आणि इतक्या ठिकाणी अध्यक्ष म्हणून जाता तर तुम्हाला महाराष्ट्राचे दुसरे 'न. चिं. केळकर' किंवा 'दत्तो वामन' असे आम्ही का म्हणू नये हो?"

'एम.डी.एच' नी आजवरचे आपले आयुष्य अध्ययन आणि अध्यापन यांना व्रत मानून सत्वस्थ वृत्तीने वेचले. 'इंग्रजीचे उत्कृष्ट प्राध्यापक' म्हणून उदंड नावलौकिक मिळविला. महाराष्ट्र राज्य सरकारने 'आदर्श शिक्षक' म्हणून त्यांचा यथोचित गौरवही केला. प्राध्यापक असताना व पुढे प्राचार्य झाल्यावरही आपल्या सहकाऱ्यांभोवती, विद्यार्थ्यांभोवती बौद्धिक वातावरण असावे त्या दोघांनी त्यात सहभागी व्हावे, ज्ञानाच्या विविध शाखांवर त्यांनी प्रेम करावे, त्यांचे ज्ञानविषयक कुतूहल सदैव जागे असावे, त्यांनी चौकस, जिज्ञासू, बहुश्रुत बनावे यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. त्यासाठी उत्कृष्ट वक्त्यांची, कलावंतांची भाषणे ते आवर्जून आमच्या महाविद्यालयात घडवून आणीत, सभासंमेलनांना जाण्यासाठी प्रोत्साहन देत. याच भावनेतून संस्थेत त्यांनी 'इन्फॉर्म क्लब'ही स्थापन केला होता. पण आजकाल शैक्षणिक विश्वात खऱ्या ज्ञानाबद्दल किती आस्था उरली आहे? बघावे तिकडे बौद्धिक दारिद्र्य आणि उदासीनताच अधिक! या साऱ्यामुळे ते खूप अस्वस्थ असतात. कधीकधी ही अस्वस्थता त्यांच्या बोलण्यातूनही प्रकट होते. ज्ञान आणि ज्ञानी माणसे याबद्दल त्यांना काय वाटते याचे प्रत्यंतर फार उत्कटतेने मला आले. 'आदर्श शिक्षक' म्हणून पुरस्कार मिळाल्यावर महाविद्यालयात त्यांचा सत्कार झाला. त्या प्रसंगी उत्तर देताना ते म्हणाले, "मी ज्या गुरुजींच्या हाताखाली शिकलो त्यांचे ज्ञान व तपश्चर्या ही फार मोठी होती. आजच्यासारखी जाहीर सन्मान देण्याची पद्धत त्यावेळी असती तर त्यांनी असे कितीतरी सन्मान मिळविले असते." कोल्हापूरच्या ज्या इंग्रजी शाळेत ते शिकले तिथले आपले शिक्षक श्री. जोसेफ शब्दांचे उच्चार विद्यार्थ्यांनी नीट करावेत यासाठी किती मेहनत करीत हे आजही ते मोठ्या अभिमानाने सांगतात.

'एम.डी.एच' 'विलिंग्डन'मध्ये शिकत असताना कन्नडमधील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. मुगळी त्यांचे प्राध्यापक होते. डेक्कान एज्युकेशन सोसायटीत 'एम.डी.एच' आजीव सदस्य म्हणून काम करू लागल्यावर 'मुगळी' सरांचे ते सहकारी झाले. पण तरीही आपल्या सरांबद्दलची त्यांची भावना पूर्वीचीच होती.'मुगळी' सर जेव्हा जेव्हा चहा प्यायला कॉमनरूममध्ये येत तेव्हा तेव्हा 'एम.डी.एच' खुर्चीवरून किंचित उठून मग पुन्हा बसत. आपल्या हातात सिगारेट असलीच तर पटकन ती खाली टाकून पायाने विझवीत. वरवर साधी वाटणारी ही गोष्ट! पण पाहणाऱ्यांना ती बरेच काही शिकवून जाई.

त्यांच्या आणखी एका गुणाचे मला विशेष मोल वाटते तो म्हणजे माणसांच्या गुणांची ते करीत असलेली कदर. माणूस लहान असो, की मोठा, कचेरीत कारकून असो की लेखक, दलितलेखक, त्यांच्या अंगच्या कलेला, विद्येला ते आवर्जून उत्तेजन देणार. त्याच्या कौटुंबिक अडचणीत त्याला सल्लामसलत देणार, त्याच्या अडचणी निवारण व्हाव्यात म्हणून प्रसंगी झीज सोसणार. या त्यांच्या स्वभावामुळेच आजवर कितीतरी गरजू बुद्धिमान विद्यार्थ्यांना त्यांनी आर्थिक सहाय्य केले आहे. पुन्हा त्याची कुठे वाच्चता नाही. यातील काहींच्या वागण्याने पुढे कधीकधी त्यांना मनस्तापही सोसावा लागल. पण त्याचीही वाच्चता नाही. माणसांप्रमाणे संस्थातूनही असे अनुभव वाट्याला येतातच की! त्यावर माझ्यासारखे कोणी स्नेही तावातावाने त्यांच्याशी बोलायला लागले म्हणजे 'हु-हूं' करीत ते सगळे ऐकून घेतात आणि आपला तोल न जाऊ देता शांतपणे म्हणतात, " मालतीबाई, अहो, हाही एक अनुभव म्हणायचा. समोर कायकाय चालते ते आपण पाहात असावे. आणि आरडाओरड केल्याने परिस्थिती नेहमीच बदलते असे थोडेच आहे?" ते असे म्हणाले तरी माझा विश्वास आहे, की तेवढीच निकराची वेळ येते तेव्हा अनेकांची नाराजी पत्करूनही वाद-विवादात आपल्याला जे न्याय्य व योग्य वाटते त्याचीच बाजू ते घेतात. थोडेच पण प्रसंगी अगदी स्पष्ट बोलून एकंदरीतच जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी "माणूस हा मूलतः चांगला असतो. तो बिघडतो, तो अनेकदा परिस्थितीने" अशी असावी, असे मला वाटते. माणसावरील अशा श्रद्धेमुळे त्यांनी बराच मोठा लोकसंग्रह केला आहे. त्यांचा मित्रपरिवार पाहिला की मला मौजच वाटते. ती अशासाठी की त्या परिवारात परस्परविरोधी राजकीय किंवा वाङ्मयीन मते असणारी मंडळी मोठ्या गुण्यागोविंदाने राहत असतात. या साऱ्यांची मोट ते कशी काय बांधत असतील देव जाणे. एक कट्टर मार्क्सवादी, तर दुसरा पक्का हिंदुत्वनिष्ठ. कोण शंभर टक्के जीवनवादी, तर कोण केवळ कलानंदवादी. एकाची शिस्तप्रियता, तर एकाची निस्सीम ईश्वरनिष्ठा, एकाची झुंजार वृत्ती, तर एकाची वाङ्मयनिष्ठा. अशा वेगवेगळ्या गोष्टी त्यांच्या कौतुकाचा विषय होतात.

प्रभाकर पाध्ये, विद्याधर पुंडलिक, भालचंद्र भणगे, व्यंकटेश माडगूळकर, वि. रा. करंदीकर, गो. मा. पवार, ग. प्र. प्रधान, एम. टी. चौहान, अ. के. भागवत, जी. ए. कुलकर्णी. भालचंद्र नेमाडे, राजाभाऊ इनामदार, डॉ. रणभिसे ही त्यांच्या मित्रवर्गातली सहज आठवलेली काही नावे. यांच्या संगतीत प्राध्यापकसाहेबांच्या काव्यशास्त्रविनोदाला बहर येतो. एक संस्कृत वचन सांगते, की बुद्धिमान माणसे एकमेकांचा मत्सर करतात, पण इथे त्याच्या उलट, सुखद चित्रच पहयला मिळते. आमच्या मोहनराव (वि. रा.) करंदीकरांची सांगलीहून पुण्याला 'फर्ग्युसन'ला बदली झाली. म्हणून महाविद्यालयातर्फे त्यांना निरोप देण्याचा समारंभ होता. त्यावेळी भाषण करताना भारावलेल्या मनाने, उत्कटपणे 'एम.डी.एच' मणाले, "डॉ. करंदीकर म्हणजे अमचे नेपोलियन आहेत." मित्रप्रेमाचे असे निर्मत्सर आणि हृदयंगम दृश्य मनात सुगंधासारखे दरवळत राहते. विद्वान माणसांबद्दल सामान्यतः येणारा अनुभव असा, की स्वतःच्या विषयापलिकडे त्यांना दुसऱ्या कशात फारसा रस नसतो. सुदैवाने 'एम.डी.एच' चे तसे नाही. नाना गोष्टींची त्यांना हौस आहे. आठ-दहा वर्षांपर्यंत महविद्यालयाच्या टेनिस कोर्टावर ते मनसोक्त टेनिस खेळत. एरवी घाईगर्दीचे वावडेच असणाऱ्या आपल्या प्राचार्यांना चेंडूमागे पळताना-धावताना बघून विद्यार्थ्यांनाही गंमत वाटे. संगीताचे, विशेषतः शास्त्रीय संगीताचे ते विशेष चाहते आहेत. कुमार गंधर्वांचे गायन किंवा रविशंकरांची सतार असल्या कार्यक्रमांना तारीख लक्षात ठेवून ते जाणार. तन्मयतेने त्या मैफलीचा आस्वाद-आनंद घेणार. मात्र इतर अनेक रसिकांप्रमाने वरचेवर माना डोलविणे, किंवा बोटाने ताल धरणे अशा गोष्टी बहुधा त्यांच्या स्वभावात बसत नसाव्यात. मग घरी आल्यावर त्या मैफलीचा विषय निघाला म्हणजे आपल्या खुर्चीत आरामात बसून दोन्ही पायांची हलवाहलव करीत, किंचित डोळे मिटून "फाऽर छान झाला होता कार्यक्रम" अशा अर्थाची मान जेव्हा ते हलवतात तेव्हा

आपण समजावे की साहेब कार्यक्रमावर खूष आहेत. परवाच गप्पांच्या ओघात त्यांचे एक स्नेही संगत होते, की चित्रकलेचीही त्यांना चांगली जाण आहे. हिंदी-मराठी चित्रपटांविषयी मला माहीत नाही, पण प्रसिद्ध इंग्रजी चित्रपट पाहयला त्यांना फार आवडते. या सर्व गोष्टींचा विचार केला की, माझ्या मनात येते, 'एम.डी.एच' करीत असलेली वाङ्मयकलासमीक्षा समृद्ध आणि सर्वस्पर्शी होते याचे एक कारण अनेक ललितकलांवरील त्यांचे हे प्रेम व जाणकारी हे तर नसेल?

अशा अभिरुचीसंपन्न आणि एखाद्या विद्यापीठाचा सहज कुलगुरू झाला असता. अशा योग्यतेच्या या सुहृदाच्या जीवनाकडे पाहताना मला ती. तात्यांची (वामन मल्हार जोशी) आठवण येते. दोघांचेही चारित्र्य स्वच्छ, निखळ . दोघांची अभिरुची, विवेकशील. वाङ्मयाकडे पाहण्याची दोघांचीही दृष्टी निकोप. आपल्या मतांपेक्षा वेगळी व विरोधी मते बाळगणाऱ्यांना जाणून घेण्याच्या बाबतीत दोघेही सहृदय, वाङ्मयातील नवनव्या प्रवाहांबद्दल दोघांनाही उत्सुकता, माणसावर लोभ करायचा तो त्यांच्या मर्यादा-उणिवांसह त्यांना जाणून घेऊन. असा दोघांचाही स्वभाव. चांगला शिक्षक हा चांगला माणूसही असतो. हेही दोघांच्यातले समान सूत्र! परवा त्यांचे मित्र प्रा. चौहान मला म्हणाले, "अँट हार्ट ही इज रिलीजस" धर्माचा पारंपरिक वा रूढ अर्थ त्यांना मुळीच अभिप्रेत नव्हता, त्या अर्थाने 'एम.डी.एच' धर्म मानतात असे मला वाटत नाही. कालपरवाच महाविद्यालयातील आमच्या सहकाऱ्यांनी त्यांची दीर्घ मुलाखत घेतली. तेव्हा ते म्हणाले, "अध्यात्म वा ईश्वरसाधना करणाऱ्यांना काही अलौकिक अनुभव येत असतीलही. पण त्या अनुभवांचा वैयक्तिक पातळीवरचा विचार व्हायला हवा. सृष्टीतील अशा विविध घडामोडींबद्दल मला कुतूहल वाटते हे खरे आहे."

त्यांचे गृहस्थी, घरगुती जीवन त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसे असे समाधानी, सुखी आहे. लहान असतनाच त्यांचे वडील अपघातात गेले. त्यानंतर आपल्या आईबरोबर ते आजोळी सांगलीला आले. तेथे त्यांचे मामा गणपतराव आरवाडे व प्रेमळ मामी सौ. तानूबाई यांनी त्यांचा प्रतिपाळ मोठ्या मायेने केला. आपल्या भाच्याच्या अंगची हुशारी त्या शिक्षणप्रेमी व दानशूर मामांनी अचूक ओळखली आणि तिच्या विकासाला सर्व संधी आणि सहाय्य दिले. आपल्या या मामा-मामींना 'एम.डी.एच' फार मानतात. यथाकाल या मामांच्याच सुस्वरूप कन्येशी-सुधाताईंशी त्यांचा विवाह झाला. वृतीने त्या धर्मशील आहेत. सुगरण आहेत. आदरातिथ्यात कुशल आहेत. प्रदीप, रेवती, विश्रब्धा या त्यांच्या तिन्ही हुशार म्हणून नाव मिळवले आहे. सुखी संसाराला आणखी काय लागते? आता हातकणंगलेकर दंपतीच्या केसांवर रुपेरी रंग चढू लागला आहे. वाचताना त्यांना चष्माही लागू लागलाय. पण या वयात अशा गोष्टी शोभूनच दिसतात खरे म्हणजे. हल्ली पुष्कळदा आपल्या दोन्ही कन्यांबरोबर 'एम.डी.एच' फिरायला जाताना दिसतात. त्यांचे 'अण्णा" दिवसभराच्या वेळात बहुधा तेव्हाच त्यांच्या वाट्याला थोडे निवांतपणे येत असावेत! बाप-लेकींचे खेळीमेळीचे वागणे पाहून मला माझ्या लहानपणीचे दिवस आठवतात. आमचे शंकरभाऊही अशाच मित्रत्वाने आमच्याशी वागायचे, आम्हाला वागवायचे! अशा आनंदात त्यांचे दिवस जात असतात. अधूनमधून अतीतकरांसारख्या बालमित्राच्या घरी गप्पाटप्पांसाठी एखादी फेरी होत असते. आणि प्रथम माझा विश्वास बसला नाही पण मी ऐकले आहे की आपल्या मित्राच्या मुलामुलींची लग्नेही नाटकातल्या प्रॉम्पटरप्रमाणे पडद्यामागे उभे राहून 'एम.डी.एच' जमवीत असतात.

मला दिसलेले 'एम.डी.एच' हे असे आहेत. तीस वर्षापूर्वीच्या मानाने हल्ली ते थोडे बोलके झाले आहेत, असे वाटते. स्कॉलरच्या मठीतून बाहेर पडून हल्ली ते समाजात पूर्वीपेक्षा थोडे मोकळेपणी मिसळताना दिसतात. आणि सार्वजनिक कामांचा त्यांच व्याप पूर्वीपेक्षा आता खूपच वाढलेला दिसतो. मला या सगळ्याचा अगदी मनापासून आनंद होतो. कारण अशा माणसामुळेच समाजाचीही सांस्कृतिक नैतिक उंची वाढायला मदत होते.

एखाद्या प्रसिद्ध संस्थेमुळे काही माणसे मोठी होतात हे जसे खरे आहे तसेच चांगल्या माणसांमुळे संस्थांचा नावलौकिक वाढतो हेही खरेच आहे. आणि म्हणूनच रँ. परांजपे, डॉ. महाजनी, तिन्ही कर्वे, आर. एन. जोशी, वाडेकर, कोगेकर अशा मान्यवर विद्वान माणसांच्याच पंक्तीत 'एम.डी.एच' चे मानाचे स्थान आहे. याविषयी माझ्या मनात सुतराम संशय नाही.

हे सर्व लिहीत असताना मला माहीत आहे, की कोणताही माणूस कितीही थोर वा कर्तबगार असला तरी तोही अखेरी माणूसच असतो. त्याने बोलून दाखविला वा न दाखविला तरी त्यालाही राग येतो. त्याचेही काही ग्रह, पूर्वग्रह असतात. एखाद्या माणसाबद्दल किंवा दृढ स्नेह्याबद्दलही त्याने बांधलेले आडाखे कधीकधी चुकतात. पण हे सगळे स्वाभाविकच असते नाही का? वेळ आली, की तो माणूस अशा गोष्टीबद्दल प्रांजलपणे लिहितो, बोलतो त्यामुळे त्याच्याबद्दल अधिकच आपुलकी वाटते.

आपल्या जीवनाचे सिंहावलोकन करण्याचे आज 'एम.डी.एच'नी ठरविले तर माझी खात्री आहे, की कृतार्थतेचे गाढ समाधान त्यांना लाभल्यावाचून राहणार नाही! "मी इंटेग्रिटी ऑफ कॅरेक्टरला ढळ लागेल असे कधी वागलो नाही जे जे काम माझ्या वाट्याला आले ते ते मी मनापासून, इमानदारीने केले." अशीच ग्वाही त्यांची मनोदेवता त्यांना देईल. असे भाग्य किती जणांच्या वाट्याला येते? म्हणून वाढदिवसाच्या या शुभप्रसंगी मी त्यांचे अणि त्यांच्या कुटुंबियांचे अंतःकरणापासून अभिनंदन करते. आणि 'एम.डी.एच'ना विनंतीपूर्वक म्हणते, " आजवर तुम्ही साऱ्यांनी माझ्यावर केलात तसाच लोभ पुढेही ठेवा. 'एम.डी.एच', आता तुमच्या नव्या देखण्या घरात तुम्ही लवकरच राहायला जाल. तिथे तुम्हाला थोडा अधिक निवांतपणा लाभेल. लाभो. आजवरच्या तुमच्या लौकिकाला शोभेल असेच लेखन तुम्ही पुढेही करीत राहाल. राहावे. यावेळी आम्हा वाचकांच्या तुमच्या लेखनाबद्दल आणखी काही अपेक्षा आहेत. त्या सांगू काय? कथा-कवितांनी आरंभ करून साहित्याच्या मुशाफिरीला तुम्ही सुरूवात केलीत. आज समीक्षकाच्या मुक्कामावर येऊन तुम्ही पोहोचला आहात. या तुमच्या साहित्यसफरीतले अनुभव तुम्ही आम्हाला कधी सांगणार? तुमचे शिक्षणविषयक प्रश्नांवरील चिंतन आम्हाला कधी वाचायला मिळणार? लोकशाहीचा-जगातल्या मोठ्या लोकशाहीचा प्रयोग आपल्या देशात आज चालू आहे. या प्रयोगाने माणूस पूर्वीपेक्षा सुखी झाला काय? असे दिसते, की सर्वच क्षेत्रात नैतिक मूल्यांची भयानक पडझड चालू आहे. 'डार्कनेस अॅट नून' झाले आहे. या साऱ्याबद्दल तुमच्यासारख्या विचारवंताला काय वाटते? परिस्थिती कधी, कशी सुधारेल असे तुम्हाला वाटते? त्यासंबंधाने तुमचे मत जाणण्यास आम्ही खरेच उत्सुक आहोत. तुमच्या साहित्यविषयक शोधबोधांइतकाच आम्हाला या प्रश्नांचाही उलगडा व्हायला हवा आहे. तो तुम्ही व्याख्यानांच्याद्वारे किंवा पुस्ताकांच्या द्वारे कसाही करावा. आणि सर्वात शेवटचा प्रश्न तुम्ही आत्मचरित्र कधी लिहिणार? "ते लिहायला आपल्याजवळ काही आहे असे मला वाटत नाही" हे तुमच्या परवाच्या मुलाखतीतले उत्तर आम्हाला मान्य नाही. तेव्हा आमच्या साऱ्या प्रश्नांच्या परिपूर्तीसाठी देवाने तुम्हाला उदंड आयुष्य द्यावे. शेक्सपिअरचे गाव, गॉर्कीचा देश इत्यादी पाहण्याची तुमची इच्छाही त्याच दयाघनाने लवकरच पुरी करावी ही सदिच्छा.

'एम.डी.एच', जीवनाच्या प्रवासात अनेक चांगली माणसे आपल्याला भेटतात. आपल्या पाऊलवाटेवर ती आपापल्यापरी आपल्या खुणाही ठेवून जातात. त्यांचे स्मरणही अपल्याला असते. पण आपल्या जिव्हाळ्यच्या सुहृदांचे व मैत्रिणींचे स्थान या सर्वांपेक्षा वेगळे, मोलाचे असते, ते मला कशासारखे वाटते सांगू? धरतीला चैतन्य देणाऱ्या सत्तावीसातील नऊ नक्षत्रांसारखे! ती नक्षत्रे वगळली तर धरणीचे जीवनच करपून जाते. माणसाचेही तसेच होते, नाही का? माझ्या सुखदुःखाशी निरपेक्षपणे समरस होणाऱ्या आणि माझ्या कल्याणचीच सदैव इच्छा करणाऱ्या माझ्या मैत्रिणी व सुहृद यांच्यातले तुम्ही एक आहात म्हणून म्हणते, "मी तुमची कृतज्ञ आहे."